**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०७ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्याच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी जाहीर झालेली कर्जमाफी योजना, कर्ज देण्यासाठी पात्र अशा कोणत्याही संस्थेकडून घेतलेल्या कर्जासाठी लागू राहील, असं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण.**
2. **नेक्स्ट जनरेशन लॉजिस्टिकचे सेंटर इंडस्ट्रियल मॅग्नेटच्या स्वरूपात नागपूरला तयार करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन.**
3. **इंधनाचा पुरेसा साठा असून तुटवड्याच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असं तेल कंपन्यांचं आवाहन.**
4. **अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये पुढील दोन दिवस तापमान चाळीशी पार जाण्याची शक्यता; हवामान खात्याचा यलो अलर्ट जारी.**

---

कर्जमाफी योजना

राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर झालेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना, कर्ज देण्यासाठी पात्र अशा कोणत्याही संस्थेकडून घेतलेल्या कर्जासाठी लागू राहील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. नागपूरमधे ते वार्ताहरांशी बोलत होते. शेतकऱ्यांची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकित राहिलेली २ लाख रुपये पर्यंतची कर्ज माफ करण्याच्या दृष्टीनं काल अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. त्याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. ही कर्जमाफी बँकेला नसून शेतकऱ्यांना आहे, असं ते म्हणाले....

***(होल्ड बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 31 सेकंद)***

नागपूरमधे अमरावती रोडवर एक्स एस आय ओ या लॉजिस्टिक आणि इंडस्ट्रियल पार्कचं लोकार्पण आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. इंधन दरवाढ तसंच गॅसच्या पुरवठ्याबाबत नागरिकांमध्ये भीती निर्माण होईल अशा कुठल्याही बातम्या पसरू नयेत याची काळजी घेण्याचं आवाहन त्यांनी प्रसारमाध्यम प्रतिनिधींना केलं. यासंदर्भात सर्व माहिती केंद्र सरकार वेळोवेळी देत आहे असं ते म्हणाले.

-----------------------------------------

घरगुती एलपीजी

घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत आजपासून ६० रुपयांनी वाढ झाली आहे. हा दर महानगरांमध्ये लागू होईल. या वाढीनंतर, आता मुंबईत घरगुती गॅस सिलिंडरची किंमत ९१२ रुपये ५० पैसे, दिल्लीत ९१३ रुपये, कोलकातामध्ये ९३९ रुपये तर चेन्नईमध्ये ९२८ रुपये ५० पैसे झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीतही ११५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

-----------------------------------------

ओम बिर्ला

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या अविश्वास ठरावावर सोमवारी सभागृहामध्ये चर्चा होणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा नऊ मार्चपासून सुरू होत असून त्याच दिवशी या ठरावावर चर्चा अपेक्षित आहे. अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात विरोधी पक्षांनी लोकसभा सचिवालयाकडे हा अविश्वास ठराव दाखल केला होता. या ठरावावर ११८ खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत. काँग्रेसचे खासदार मोहम्मद जावेद, के. सुरेश आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यावतीने ही सूचना मांडली जाणार आहे. दरम्यान काँग्रेस आणि भारतीय जनता पक्षानं नऊ आणि दहा मार्च रोजी सर्व सदस्यांना सभागृहात उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.

-----------------------------------------

नेक्स्ट जेन इंडस्ट्रियल पार्क

नेक्स्ट जनरेशन लॉजिस्टिकचे सेंटर हे नागपूर होईल .नागपूरच्या अमरावती रोड वरील लिंगा या ठिकाणी नेक्स्ट जेन इंडस्ट्रियल पार्क तयार झाला असून एक इंडस्ट्रियल मॅग्नेटच्या स्वरूपात नागपूरला तयार करण्यासाठी हा इंडस्ट्रियल आणि लॉजिस्टिक पार्क एक मैलाचा दगड म्हणून प्रस्थापित होईल असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले .एक्सएसआयओ या अत्याधुनिक औद्योगिक आणि लॉजिस्टिक पार्कचे भूमिपूजन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते .

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 16 सेकंद)***

यावेळी निर्माण क्षेत्राबद्दल माहिती देताना फडणवीस यांनी सांगितले की, निर्माण क्षेत्र हे इनोवेशन आणि ऑटोमेशनच्या मुळे खूप झपाट्याने बदलत आहे .ॲडव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग हा आताचा मंत्र आहे. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता आणि त्यावर

आधारित तंत्रज्ञानामुळे या क्षेत्राला मोठ्या प्रमाणात परिवर्तनाला सामोरे जावे लागत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा जगात तिसऱ्या क्रमांकाकडे प्रवास सुरू आहे ,यामुळे निर्माण क्षेत्र आपल्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.भूराजकीय परिस्थितीमुळे पुरवठा साखळीच स्वरुप बदलत असून अशा इंडस्ट्रीज पार्क मध्ये असणाऱ्या 'प्लग अँड प्ले' सुविधेमुळे तिथेच मॅन्युफॅक्चरिंग होईल आणि पुरवठा साखळीला बळ मिळेल असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

-----------------------------------------

पेट्रोल आणि डिझेलच्या टंचाई/'टीआरपी रेटिंग'

पेट्रोल आणि डिझेलच्या टंचाईबाबत समाज माध्यमावर पसरणाऱ्या बातम्या पूर्णपणे निराधार आहेत. नागरिकांनी या संदर्भातील अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन 'इंडियन ऑइल'तर्फे करण्यात आलं आहे. देशात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा आणि वितरण व्यवस्था सुरळीतपणे सुरू आहे. इंधन पुरवठ्यात कोणताही खंड पडलेला नाही, असं इंडियन ऑइलनं स्पष्ट केलं आहे. नागरिकांनी घाबरून न जाता पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी करू नये आणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असंही इंडियन ऑईलनं म्हटलं आहे. दरम्यान, इस्त्रायल-इराण यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं प्रसारण प्रेक्षक संशोधन परिषदेला पुढील चार आठवड्यांसाठी वृत्तवाहिन्यांना दिलं जाणारं 'टीआरपी रेटिंग' तात्काळ थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. काही वृत्तवाहिन्या इस्त्रायल-इराण संघर्षाबाबत संवेदनशील आणि संदिग्ध माहिती प्रसारित करत असल्याचं सरकारच्या निदर्शनास आलं आहे. अशा वृत्तांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये, विशेषतः ज्या लोकांचे नातेवाईक युद्धग्रस्त भागात राहतात, त्यांच्यामध्ये अनावश्यक भीती आणि चिंता निर्माण होत असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. त्यामुळे परिस्थिती लक्षात घेता तात्पुरता उपाय म्हणून ही मानांकन प्रक्रिया चार आठवड्यांसाठी स्थगित ठेवण्यात आली आहे. पुढील निर्देश मिळेपर्यंत ही बंदी लागू राहणार आहे.

-----------------------------------------

जागतिक महिला दिन

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त उद्या 8 मार्च रोजी देशभरात 250 ठिकाणी' (Achieving Sports Milestone by Inspiring Women Through Action अर्थात "अस्मिता; या  कार्यक्रमांतर्गत भव्य देशव्यापी ॲथलेटिक्स लीग आयोजित करण्यात येणार असल्याची  माहिती केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी दिली

आहे.भारतीय क्रीडा प्राधिकरण अर्थात साई आणि माय भारत यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार असून, 13 वर्षांखालील, 13 ते 18 वर्षे आणि 18 वर्षांवरील अशा विविध वयोगटांमध्ये 100 मी., 200 मी. आणि 400 मी. धावण्याच्या स्पर्धा आयोजित केल्या जातील, असे खडसे यांनी सांगितले.30 पेक्षा अधिक राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये ही लीग आयोजित केली जाणार असून यात ईशान्येकडील राज्यांचाही समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर महानगरपालिकाद्वारा स्त्री शक्तीचा जागर आणि स्त्रीत्वाच्या सन्मान करण्यासाठी जागतिक महिला दिनानिमित्त उद्या 8 मार्च रोजी "पिंक मॅराथॉन" चे आयोजन धंतोली येथील यशवंत स्टेडियम येथे करण्यात येत आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महिला स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे दिली जाणार असून, महिलांनी मोठ्या संख्येत सहभाग नोंदवावा असे आवाहन नागपूर महानगरपालिकेद्वारा केले जात आहे. उद्या मानेवाडातील संत गजानन महाराज मंदिर सभागृह येथे जागतिक महिला दिनानिमित्ताने धनगर समाजातील महिलांचा मेळावा आयोजित करण्यात आला असून, यामध्ये उद्योजकता आरोग्य मार्गदर्शन त्याचप्रमाणे आरोग्य तपासणी असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दरम्यान, जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषद अकोला येथे महिला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी विशेष आरोग्य तपासणी आणि उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिरात विविध विभागांतील महिलांची सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली.

---------------------------------------

सिने चौरंग

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ग्रामीण भागातील लोकांसाठी सिने चौरंगी प्रकल्पाचे ‘एकल हब’ उद्घाटन केले. या हबद्वारे ग्रामीण भागातील लोकांना शिक्षण, मनोरंजन, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, ज्यामुळे हॅपी ह्युमन इंडेक्स वाढेल, असे गडकरी म्हणाले. ‘एकल हब’मध्ये दोन स्क्रीनसह सिनेमा थिएटर, शिक्षण केंद्र आणि किरकोळ व्यावसायिक जागा असतील. सकाळी शैक्षणिक व कौशल्य विकास कार्यक्रम व संध्याकाळी चित्रपटांचे प्रक्षेपण करण्यात येईल.प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर आणि यवतमाळ या जिल्ह्यांतील सुमारे २० तालुक्यांमध्ये ‘एकल हब’ उभारण्याचे नियोजन आहे.

-----------------------------------------

हवामान

राज्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून अनेक भागांत तापमान झपाट्याने वाढताना दिसत आहे. राज्यातील कमाल तापमानाचा पारा ३६ अंश सेल्सिअस पार करून काही ठिकाणी चाळीशीकडे झुकताना दिसत आहे. हवामान खात्याने पुढील दोन दिवस राज्यातील तापमानात आणखी वाढ होण्याचा इशारा दिला असून काही जिल्ह्यांसाठी उष्णतेचा यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.विदर्भात उष्णतेचा सर्वाधिक परिणाम दिसून येत आहे. आज राज्यातील सर्वाधिक तापमान अमरावती येथे ४०.८ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले. अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये पुढील दोन दिवस तापमान चाळीशी पार जाण्याची शक्यता असल्याने या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात तापमान सामान्यपेक्षा सुमारे पाच अंशांनी जास्त राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्येही तापमान ३८ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

-----------------------------------------